# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/11/2022 (मंगळवार) दुपार

---

## मोका गुन्हयातील फरार आरोपीला उमरेड पोलीसांनी केले जेरबंद

पो.स्टे. उमरेड :— अप. क्र. ५१/२०२२ कलम ३६४(अ), २९४, ५०६(ब), १२०(ब), भांदवि. सह कलम ३/२५ भा. ह. का. सहकलम १३५ म. पो. का. सहकलम ३(१)(ii), 3(2), 3(4), 4 म. स. गु. नि. का. १९९९ अन्वये पोलीस स्टेशन नंदनवन नागपूर शहर येथे गुन्हा नोंद झाला होता. या गुन्हयातील आरोपी नामे—१) प्रमोद उर्फ पप्पु कृष्णकुमार अवस्थी, वय ५२ वर्ष, २) सौ. पद्मा प्रमोद अवस्थी, वय ४५ वर्ष, ३) आशुतोष उर्फ आशु प्रमोद अवस्थी, वय २६ वर्ष, रा. तिन्ही १०३ ताजश्री पॅलेस जगनाडे चौक, नागपूर यांना अटक करण्यात आली असुन यातील आरोपी क्र. ४) राजु उर्फ काल्या सुर्यभानजी इजमुलवार, वय ५० वर्ष, रा. कावरापेठ पाण्याची टाकी उमरेड हा आजपावेतो फरार असुन सदरचा आरोपी हा कावरापेठ पाण्याची टाकीजवळ उमरेड येथील त्याचे राहते घरी आज दिनांक २९/११/२०२२ रोजी सकाळी येणार असल्याची माहिती गुप्त बातमीदाराव्दारे पोलीस स्टेशन उमरेड येथील पोलीस नायक राधेश्याम कांबळे यांना माहिती प्राप्त झाल्यावरून त्यांचे माहितीवरून पोलीस उमरेड येथील पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे, पोलीस नायक राधेशाम कांबळे, पोलीस नायक प्रदीप चवरे, पोलीस नायक तिलक रामटेके यांचेसह कावरापेठ पाण्याचे टाकीजवळ सापळा रचुन फरार आरोपी राजू उर्फ काल्या सुर्यभानजी इजमुलवार हा तेथे येताच त्याला ताब्यात घेवुन त्याचे नाव व पत्ता विचारून शहानिशा केली असता त्याने आपले नाव राजु उर्फ काल्या सुर्यभानजी इजमुलवार, वय ५० वर्ष, रा. पाण्याची टाकीजवळ कावरापेठ उमरेड असे सांगितलेवरून त्यास ताब्यात घेवुन पुढील कारवाई कामी पोलीस स्टेशन नंदनवन नागपूर शहर यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद सा., अपर पोलीस अधीक्षक सा. डॉ. संदिप पखाले सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे, पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे, पोलीस नायक प्रदीप चवरे, राधेशाम कांबळे, तिलक रामटेके, पंकज बट्टे पोलीस स्टेशन उमरेड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर